नि.दि. दा .क्र.८७ /२०१८
संजु वि. गरवारे वॉल्स रोप्स
नि २९ पुढे सुरू

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील उलटतपास शपथेवर सुरु**
**प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री डी.जे भणगे –**

२८. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २६.०८.२०१७ रोजी प्रतिवादी कंपनीचे कामगार विकास सुबराव पाटील यांनी माझ्या विरुध्द पोलीसात तक्रार दिली होती व त्यावरुन अदखलपात्र गुन्हयाची नोंद करण्यात आली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदरची तक्रार ही मी व विकास सुबराव पाटील यांनी मिळुन घेतलेल्या कर्ज पकरणाबाबत होती, त्या कर्जाची रक्कम मी अदा करावी असा माझ्याकडे विकास पाटील यांनी तगादा लावला होता आणि त्या करिता त्यांनी मला फोनवर शिवीगाळ सुध्दा केली होती, म्हणुन मी उपरोक्त विकासने दिलेल्या तक्रारीच्या पुर्वीच त्याच्या विरुध्द पोलीस ठाणे वाई येथे तक्रार दिली होती व ती लोखंडे नावाच्या पोलीस कर्मचा-याने नोंदवुन सुध्दा घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, विकासने दिलेली तक्रार ही कर्ज प्रकरणा संदर्भात होती व त्या कर्ज प्रकरणात विकास हा मला जामीनदार होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या कर्जाची रक्कम मी परतफेड करत नव्हतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सद्यस्थीतीत ते कर्ज प्रकरण मी संपुर्ण कर्ज रक्कम अदा केल्याने संपले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या कर्ज प्रकरणात कर्जाची परतफेड केली नसल्याने विकासच्या पगारातुन हप्त्याची रक्कम कपात होत होती. हे म्हणणे खरे आहे की, ते प्रकरण रक्कम रुपये ४,७०,०००/- करिता होते व ते मी सन २०१५ मध्ये घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, ते कर्ज मी वाई येथील हॉटेलाकरिता घेतले होते.

**प्रकरण पुढील उलटतपासाकरिता तहकुब**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.11.06 15:46:37 +0530

दि.०४.११.२०२५

(आर.एम. भेंडे)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वाई.